| | | |
|---|---|---|
| | पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

# प्रेस नोट

दिनांक : १९/१०/२०२४

**महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०२४ च्या पार्श्वभुमीवर नाशिक ग्रामीण पोलीस दलाची अवैध व्यवसायांविरुध्द धडक कारवाई - वणी परिसरात १.७५ लाखांचा अवैध मद्यसाठा जप्त चांदवड व सायखेडा परिसरात अवैधरित्या घातक शस्त्रे बाळगणा-यांवर कारवाई**

---

दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासुन महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागु करण्यात आली असून त्या पार्श्वभुमीवर नाशिक परिक्षेत्राचे मा. विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. दत्तात्रय कराळे, पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून नाशिक ग्रामीण जिल्हयात खालीलप्रमाणे अवैध व्यवसायांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

दिनांक १८/१०/२०२४ रोजी वणी पोलीस ठाणे हद्दीत कोशिंबे ते भनवड जाणारे रोडवर अवैधरित्या मद्याची वाहतुक होत असल्याची गोपनीय बातमी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने कोशिंबे ते भनवड रोडवर सापळा रचुन एका महिंद्रा मार्शल वाहनावर छापा टाकुन **देशी व विदेशी मद्याचा १,७६,६४०/- रू.** किंमतीचा अवैध मद्यसाठा व महिंद्रा मार्शल वाहन असा एकुण ५,७६,६४०/- रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर छापा कारवाईत इसम नामे राजेश उर्फ कृष्णा बाळु बोडके, वय २७, रा. कोशिंबे, ता. दिंडोरी, जि.नाशिक हा विनापरवाना बेकायदेशीररित्या देशी व विदेशी मद्याची वाहतुक करतांना मिळुन आला आहे. सदरचा अवैध मद्यसाठा हा त्याचा साथीदार नामे किरण दिनेश नागरे, रा. नाशिक याचा असल्याचा उघडकीस आले असून सदर दोन्ही इसमांविरूध्द वणी पोलीस ठाणेस महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच सायखेडा पो.स्टे. हद्दीत चांदोरी शिवारात दहशत पसरविण्याचे उद्देशाने अवैधरित्या धारदार तलवार हातात घेवुन धमकी वजा डायलॉग मारून इन्स्टाग्रामवर रिल बनवुन व्हायरल करणारा इसम नामे मनोज धोंडीराम शिरसाठ, वय २५, रा. नाठेगल्ली, चांदोरी, ता.निफाड यास रिलमधील तलवारीसह ताब्यात घेवून त्याचेविरूध्द सायखेडा पोलीस ठाणेस भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चांदवड शहरात इसम नामे १) सौरभ संजय निरभवणे, व २) रोहित सुरेश निरभवणे, दोन्ही राजवाडा, चांदवड, ता. चांदवड, जि.नाशिक हे दोघे काहीतरी दखलपात्र स्वरूपाचा गुन्हा करण्याचे उद्देशाने अंमली पदार्थांचे सेवन करून सार्वजनिक ठिकाणी हातात लोखंडी कोयता घेवुन आरडाओरड करून लोकांमध्ये दहशत निर्माण करत होते, सदर इसमांना रंगेहात ताब्यात घेवुन त्यांचेविरूध्द चांदवड पोलीस ठाणेस भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५, सह महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ८५(१), महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३)/१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी याकरीता जिल्हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार, हिस्ट्रीशीटर तसेच उपद्रवी इसम व समाजकंटक असे एकुण ६३० इसमांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक १८/१०/२०२४ रोजी जिल्हयात वरील प्रमाणे कारवाई करण्यात आली असुन आगामी कालावधीत पोलीस ठाणेनिहाय सत्वर कारवाई करण्यात येणार आहे.